# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/१२/२०१६

**१) शाळेतील कंम्पुटर सामानाची चोरी :-**

दिनांक २९/११/२०१६ चे १७.३० वा. ते ३०/११/२०१६ चे ०७.१५ वा. दर. यातील विकास हायस्कुल पवनी येथील फिर्यादी अशोक महादेव माथुरकर वय ४५ वर्ष, रा. नेहय प्राथमीक शाळे जवळ शक्रवारी वार्ड पवनी शाळेला कुलुप लावुन आपले घरी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने शाळेतील बंद दरवाज्याची कडी व कोंठा तोडुन आम प्रवेश करून जी.ए.-१ व्ही.डी. ६६७ क्रमांकाचा १ संघनक २, सि.पी.यु. १ टिएसटी कंपनीचा मॉनिटर ए.व्ही १९६ एच क्यु. एलए ९,बीएलवाय एच क्यु एच ३००४३३००,एबी ४५८५०१,कास्पुटीग डीव्हॉइस , १ टिव्हीएस की बोर्ड व एसके कंपनीचा माउस असा एकुन कि. १४,०००/-रू चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५४,४५७,३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. बोरखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) अवैद्यरित्या रेतीची चोरी:-**

दिनांक ३०/११/२०१६ चे १७.००ते १७.३० वा.दर. यातील आरोपी क्र. १ चा बिना नंबरचा ३२३० न्यु हॉल्ट कंपनीचा व ट्रॉली क्र. एमएच ३६ डी ८७७९ च्या मालकाने आरोपी क्र. २ चालक ३ व ४ सोतब संगनमत करून अंदाजे १ ब्रास रेती कि. २०००/रू ची अवैद्यरित्या चोरी करून तसेच आरोपी क्र. ५ याने आरोपी क्र. ६ यांनी आपले २ आयसर कंपनीचे ट्रॅक्टर मध्ये चालकासह संगमत करून वैनगंगा नदीत येनोळा रेती घाटातुन अवैद्यरीत्या रेती चोरी करतांना ट्रक्टरसह पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा राऊत पोस्टे पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक

**३) अवैद्यरित्या मॅग्नीज ची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद:-**

दिनांक ३०/११/२०१६ चे ०९.०० वा. दर. यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अवैद्यरीत्या २० टन काळया रंगाचे दगडाचे लहान तुकडे (मॅग्नीज) कि. १,८०,०००-/रू चा माल साठा करून , चोरी करून डम्परवर ट्रॉली खाली करीतांन मिळुन आल्याने व ट्रॅक्टर चालक पोलीसांना पाहुन पडुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. पेंदाम पोस्टे तुमसर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**४) उभ्या ट्रक मधील बॅटरीची चोरी . : -**

दिनांक १९/११/२०१६ चे ११.०० ते ३०/११/२०१६ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी चागंमल दगडुजी साठवणे वय ४८ वर्ष रा. सिरसी याचा ट्रक क्र. एमएच ३६ एफ १८०२ हा ड्रायव्हरनी ग्रा.प. कार्यालय समोर उभा ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने त्या ट्रकची सुवीतो कंपनीची बॅटरी २ नग कि. १५०००/-रू ची चोरून नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणाने भांडण करून काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . : -**

दिनांक २६/१०/२०१६ चे १६.०० वा. दर. यातील फिर्यादी नितीन जयराम हेडाऊ वय ३२ वर्ष, रा. सिहोरा यांच्या घराचे बांधकामाकरीता जेसीपी मशीन आनण्याकरीता यातील आरोपीचे घराच्या समोरील लावलेल्या सिताफळाच्या झाडाच्या फांदया तोडल्याने तिन आरोपीतांनी सिताफळाच्या फांदया कशाला तोडल्या या कारनावरून भांडण करून काठयाने व हाताबुक्याने फिर्यादीस मारहान करून उजव्या हाताला मार लागुन फॅक्चर केल्याने रेडीओ लॉजीस्टर सा. रू. भंडारा यांचे वैद्यकिय अहवाल व चौकशी वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२५,३२३,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो.स्टे सिहोरा हे करीत आहेत.

६) विवाहीतेस शारीरीक व माणसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद. : –

दिनांक २१/०९/२०१६ चे ०८.०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीचे चारीत्र्यावर संशय घेवुन फिर्यादीला घर बांधनी करीता आपले वडीलाच्या घरून पैसे आण अशी मागनी करून तिला माणसीक व शारीरीक त्रास देवुन शिवीगाळ करून मारपीट केले व पतीचे त्रासाला कंटाळल्याने फिर्यादीने पो.स्टे.ला तोंडी रीपोर्ट दिल्याने व महीला समुपदेशक केद्र भंडारा यांचे जा. क्र. १०/१६ दि. ३०/११/२०१६ चे अन्वये पत्र दिलयाने पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४९८ (अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

७) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक ३०/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर ,तुमसर व अडयाळ येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४८ लिटर हातभट्टी दारू कि. ३,६००/–रू. व १ लिटर ८० मिली लिटर देशी दारू कि. ३००/–रू असा एकुण कि. ३,९००/ –रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.